दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २९५ वा शनिवार दि.०४ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लातूरच्या विकासाची गॅरंटी माझी निलंग्याच्या महाविजय संकल्प सभेत विकासपुरूष नितीन गडकरी यांची ग्वाही

लातूर-टेंभूर्णी महामार्गाचे काम लवकरच तर निलंगा मतदारसंघातील रेल्वे मार्गासाठी पाठपुरावा करणार आपल्या भाषणात नितीन गडकरी यांनी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मकता दर्शवत लातूर-टेंभूर्णी महामार्गाला मंजूरी मिळाली असून त्यासाठी ४६० रुपये मंजूर केले असल्याचे सांगितले. ४५ मीटरच्या या रस्त्याचे काम आगामी तीन-चार महिन्यात सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले. निलंगा मतदारसंघातून जाणार्या रेल्वेचे सर्वेक्षण झालेले असून लवकरच या कामाला सुरूवात व्हावी याकरिता आवश्यक असणारा पाठपुरावा आपण करू. असा शब्द देवून निलंग्यासह लातूरच्या विकासाची गॅरंटी माझी, असा विश्वास ना. गडकरी यांनी उपस्थित जनसमुदायास दिला.

देव, देश, धर्म ही पंतप्रधान मोदींची त्रिसूत्री : अरविंद पाटील

देव, देश आणि धर्म या त्रिसूत्रीचा संगम साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील दहा वर्षात विकास कामांना गती दिली आहे. अध्यात्मिकतेला सांस्कृतिक जोड देवून त्यांनी विकसित भारताची संकल्पना मांडली आहे. या अनुषंगाने गेल्या दहा वर्षात देशात व लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. परंतु, काळे चष्मे घातलेल्या लातूरच्या दोन्ही युवराजांना ही कामे दिसत नाहीत. त्यांनी केलेली विकासकामे जाहीरपणे सांगावीत. त्यांच्याच व्यासपीठावर येवून मी आपल्या सरकारने केलेली विकासकामे सांगण्यास तयार आहे. युवराजांच्या पालकमंत्रीपदाच्या काळात रस्त्यावर एक टोपले खडी व डांबरही पडलेले नाही. आणि हीच मंडळी आज विकास झालाच नाही, असे आरोप करत आहेत. या विकास कामांची चर्चा करण्यासाठी मी कोणत्याही व्यासपीठावर येण्यास तयार आहे, असे खुले आव्हान अरविंद पाटील निलंगेकर यांनी दिले.

निलंगा/प्रतिनिधी : देशातील जनतेने दहा वर्षांपूर्वी भाजपा आणि नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवत आम्हाला निवडून दिले. त्यामुळे देशात गतिमान पध्दतीने विकास कामे होत आहेत. ही निवडणूक केवळ खा. सुधाकर शृंगारे यांचे भवितव्य ठरविणारी नाही तर जनतेच्या भविष्याचा फैसला या निवडणुकीत होणार आहे. लातूर जिल्ह्यासाठी आ. संभाजी पाटील निलंगेकर व खा. सुधाकर शृंगारे यांनी आजपर्यंत विविध योजना खेचून आणलेल्या आहेत. यापुढेही जिल्ह्याच्या विकासासाठी जी कामे ही मंडळी माझ्याकडे घेवून येतील ती कामे करून देण्याची गॅरंटी देण्यासाठी मी इथे आलो आहे. लातूरच्या विकासाची गॅरंटी मी देतोय, असा शब्द केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री विकासपुरूष नितीन गडकरी यांनी दिला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ निलंगा येथील शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित विराट महाविजय संकल्प सभेत ना. गडकरी बोलत होते. मंचावर राज्याचे मंत्री संजय बनसोडे, माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, माजी खा. रुपाताई पाटील निलंगेकर, लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अमर राजुरकर, आ. देवराज होळी, माजी आ. गोविंद केंद्रे, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, विश्वजीत गायकवाड, जि. प.चे माजी अध्यक्ष मिलिंद लातूरे, पंडीत धुमाळ, राष्ट्रवादीचे व्यंकट बेद्रे, भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष रोहीत कराड, युवा नेते ऋषिकेश कराड, शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी माने, मनसे जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाणे, शिवसेनेचे सुधीर पाटील, विनोद आर्य, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, निलंगा विधानसभा प्रभारी दगडू सोळंके, तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, अॅड. संभाजीराव पाटील, जयश्रीताई पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.






उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करताना नितीन गडकरी यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत खुमासदार भाषेत नागरिकांना खिळवून ठेवले. विरोधकांचा समाचार घेताना गडकरी म्हणाले की, मागील दहा वर्षात केंद्रातील सरकारने जनविकासाची खूप कामे केली आहेत. अजूनही कामे शिल्लकच आहेत. विकासाला प्राथमिकता देवून भाजप सरकार काम करत आहे. परंतु विरोधक अपप्रचार करत आहेत. भाजपाला बहुमत मिळाल्यास संविधान बदलणार असल्याचा गवगवा केला जात आहे. परंतु घटनेतील मुलभूत तत्त्व बदलता येत नाहीत. सर्वोच्च न्यायालयानेही तसा निर्णय दिलेला आहे. संविधानाच्या दुसर्या टप्प्याची मात्र काँग्रेसने ८० वेळा तोडफोड केली. आणिबाणीच्या काळात संविधानाची ऐशीतैशी करण्यात आल्याचे गडकरी म्हणाले. गडकरी यांनी सांगितले की, जाती-पातीच्या राजकारणाने जनतेचे कल्याण होत नाही. गरीबीला कधीही जात नसते. देशातील महागाई, गरिबी, बेरोजगारी कमी करण्यासाठी भाजपा सरकार अविश्रांतपणे काम करत आहे. त्यातूनच आज दिसणारा विकास झालेला आहे. या विकासाचे श्रेय आम्हा नेते मंडळींचे नाही तर देशातील जनतेचेच आहे. जनतेने आम्हाला निवडून दिले नसते तर हा विकास करणे शक्यही झाले नसते, असे देखील गडकरी म्हणाले. उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन करताना माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी सांगितले की, मागील दहा वर्षात केंद्रातील मोदी सरकारने जबरदस्त कामे केली आहेत. या कामाला कसलीही तोड नाही. पायाभूत सुविधा, रेल्वे, रोजगार याबाबतीत मोठ्या प्रमाणात कामे झाली. ही निवडणूक देशाचा कारभार कोणाकडे सोपवायचा याच्यासाठी होत आहे. त्यामुळे जनतेने विचार करून विकासाला मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. केंद्र व राज्यातील सरकारने रोजगार निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात योजना आणल्या. राज्यातील सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविला असेही चव्हाण म्हणाले. यावेळी मार्गदर्शन करताना लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी गडकरी हे आपल्यासाठी आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी दिल्लीत असणारे नेते असल्याचे सांगितले. लातूर जिल्ह्याचा पालक म्हणून गडकरी यांनी जबाबदारी स्वीकारावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आ. निलंगेकर म्हणाले की, गडकरी यांनी जिल्ह्याला चार राष्ट्रीय महामार्ग दिले. आता निलंगा विधानसभा मतदारसंघातून जाणार्या रेल्वेचे सर्वेक्षण झाले आहे. दक्षिण व उत्तर भारताला जोडणारी ही रेल्वेलाईन असून ती आपल्या शब्दावर पूर्ण होवू शकते, असेही ते म्हणाले. लातूर जिल्हा हा विकासाच्या मुद्यावर मतदान करतो. त्या भागात विकास पुरूष नितीन गडकरी यांचा पदस्पर्श झाल्याने या परिसराचे सोने होईल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. तत्पूर्वी उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, ना. संजय बनसोडे, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, अॅड. जयश्री पाटील, शिवाजी माने आदींनी मतदारांशी संवाद साधत भाजपा महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले.

# मोदी सरकारचे काम घराघरात पोहोचवा : ना. संजय बनसोडे






उदगीर/प्रतिनिधी : देशाला अखंड ठेवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. मागील १० वर्षात आपल्या देशाचा जो विकास झाला तो केवळ भाजपा सरकारच्या दुरदृष्टीमुळेच झाला आहे. सध्याची लोकसभेची निवडणूक ही देशाला योग्य दिशेने घेवुन जाणारी आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व बुथप्रमुखांनी एकदिलाने काम करुन प्रत्येक घरात मोदी सरकारचे काम पोहोचवावे, असे आवाहन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले. भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना शिंदे गट, रिपाई आठवले, राष्ट्रीय समाज पार्टी, जनसुराज्य शक्ती पक्ष, रासप, मनसे, महायुतीचे अधिकृत उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ जि.प. वाढवणा सर्कल मधील बुथ प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकार्यांशी हाळी - हंडरगुळी येथील संवाद मेळाव्यात ना. बनसोडे बोलत होते. यावेळी लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी आ. गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, भगवानराव पाटील तळेगावकर, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी जि.प. सदस्य बसवराज पाटील कौळखेडकर, महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, माजी सभापती बापुराव राठोड, प्रा.श्याम डावळे, विकास जाधव, शिवशंकर धुप्पे, शिवाजीराव माने, संग्राम भोसले, भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, बालाजी भोसले पाटील, बाबासाहेब काळे पाटील, दयानंद कांबळे, नंदु नळंदवार, अॅड. दत्ताजी पाटील, शहाजी पाटील, दत्ता बामणे, खाजा तांबोळी, प्रभाकर पाटील, देवेन बिरादार, शिवाजी माने, विजय आंबेगावे, विकास मुसणे, भांगे, मुस्तफा टप्पेवाले, शिल्पा इंगळे, वर्षाराणी धावारे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी, आपले बुथ प्रमुख हीच आपली ताकद असुन जो बुथ जिंकेल तोच पक्ष विजयी होईल. ही निवडणूक जनतेने हातात घेतली आहे. जनतेनेच अबकी बार, चारसौ पारचा नारा दिला आहे. लोकसभेच्या मतदानाला आता ४-५ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी घराघरात जावून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे काम सांगा. केंद्र शासनाच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला पुढे घेवुन जाण्याचे काम राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे करत आहेत. या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या मतदार संघाचा आपण झपाट्याने विकास केला असल्याचेही ना.बनसोडे यांनी सांगितले. यावेळी बोलताना माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की , विकसित लातूर हे आपल्या सर्वांप्रमाणेच पंतप्रधान मोदीजींचे देखील स्वप्न आहे. लातूरमध्ये झालेल्या जाहीर सभेमध्ये लातूरला विकसित भारताचे केंद्र बनवायचे आहे हा आपला उद्देश त्यांनी बोलून दाखवला आहे. आज देश विकासाच्या वाटेवर अत्यंत वेगाने पुढे जात असताना त्यामध्ये आपल्या लातूर जिल्ह्याचा देखील सिंहाचा वाटा असला पाहिजे. यासाठी आपण सर्वांनी पंतप्रधान मोदीजींचे हात बळकट करण्यासाठी महायुतीला प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन यावेळी आ. निलंगेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार राम जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते व पदाधिकारी बूथ प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औरादचा पारा ४४ अंश सेल्सिअसवर

निलंगा ( प्रतिनिधी ) तालुक्यातील औराद शहाजानी येथील तापमानामध्ये उच्चं की वाढ होऊन दिनांक ३ मे रोजी तापमान ४४ अंश झाल्याने गर्मीने नागरिकांचा जीव असावी झाला आहे वाढत्या तापमानामुळे नागरिक थंड पेयाकडे वळले आहेत . तर औरादचा तेरणा व मांजरा काट तापल्याने उकाड्यामुळे नागरिकांच्या अंगाची लाही लाही होत आहे.निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी हे शहर तेरणा व मांजरा नदीच्या मशीत वाढले आहे . यामुळे औरादसह परिसरातील नागरिकांना थंडीमध्ये कडाक्याची थंडी व उन्हाळ्यामध्ये उच्चांकी तापमानाला तोंड द्यावे लागते . गेल्या तीन दिवसापासून तापमानामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे दि १ मे रोजी ४२.५ अंश सेल्सिअस तर दि २ मे रोजी ४३ अंश सेल्सिअस व आज दि ३ मे रोजी ४४ अंश सेल्सिअस तापमान झाल्याने औरादसह परिसर तापला आहे.वाढत्या तापमानामुळे आबाल वृद्ध लहान मुले व नागरिकांचा जीव कासावीस होत आहे उकाड्यामुळे नागरिक दुपारच्या वेळी सावलीचा आसऱ्याचा आसरा घेत घराच्या बाहेर पडत नसल्याने दुपारच्या वेळी रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे. गर्मी पासून सुटकारा मिळण्याकरिता नागरिकांचा थंडपयाकडे कल वळल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे गरिबाचा फ्रिज माठ , छत्री , गमच्या , टोपी , कुलर आदी खरेदी कडे तोंडा वाढला आहे .गेल्या तीन दिवसापासून तापमानात वाढ होऊन आज औराद शहाजानी येथील हवामान केंद्रावर ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असल्याचे हवामान मापक मुक्रम नाईकवाडे यांनी एकमतशी बोलताना सांगितले.

# अति पावसाने मोहफूल हंगामावर गंडांतर रोजगारापासून वंचित राहिले मजूर : रानमेव्यातून होते आर्थिक उलाढाल

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट तालुक्यात मोठे जंगल आहे; पण २०२३ च्या पावसाळ्यात झालेला पाऊस आणि त्यानंतरही परतीच्या प्रवासाला असलेल्या पावसाने लावलेली हजेरी यामुळे रानमेवा म्हणून संबोधले जाणारे मोहफूल यावर्षीच्या उन्हाळ्यात म्हणावे तसे आलेच नाहीत. परिणामी या हंगामावर यंदा गंडांतर आले आहे. त्यामुळे गोरगरिबांना मोहफूल गोळा करण्यापासून दूर राहण्याची वेळ आली आहे. मोहफुलेच नाहीत तर टोई म्हणविल्या जाणाऱ्या बियाही दुर्मीळच बनल्या आहेत. किनवट या डोंगराळ तालुक्यात ६७ हजार १२५ हेक्टर जंगल क्षेत्र आहे. रानमेवा म्हणून संबोधल्या जाणारे मोहफूल, चारोळी, टेम्बुर, डिंक व इतर रानमेवा आदिवासी व इतर बांधव उन्हाळ्यात जमा करून त्याची विक्री करतात. मोहफुलाचा हंगाम शेतकरी, शेतमजूर मोठ्या प्रमाणावर घेतात. पहाटे उठून मोहफूल वेचण्यासाठी जंगलात जावे लागते. कित्येकदा हिंस्त्र प्राणी व वन्यप्राण्यांचे दर्शन मोहफुले वेचणाऱ्यांना होते. पहाटे गेलेले मजूर सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत तहानभूक विसरून काम करतात. हा हंगाम दरवर्षी अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर घेतात. मोहफुलांची वेचणी झाली नाही.. मोहफुले वेचून गोळा करून त्याला वाळवणे. नंतर ते बाजारात विकून कोणी घरप्रपंच चालवतात, तर कोणी घरात ढीग मारून पेरणीच्या वेळी विकून बी भरण करतात. यावर्षी पावसामुळे मोहफुले आलीच नाहीत. त्यामुळे म्हणावे तसे उत्पादन आले नसल्याने मोहफुलांची



वेचणी झालीच नसल्याचे चित्र आहे. मोहफुले आली नाहीत. रोजगार बुडाला.

:आता मे महिन्यात येणाऱ्या मोहाच्या टोया (बिया) सुद्धा येणार नसल्याने या हंगामावर जणू गंडांतर आले आहे. टोयापासून औषधयुक्त तेल काढून ते यापूर्वी खाण्यासाठी वापर करीत असे. असे वयोवृद्ध शेतकरी, शेतमजूर सांगतात. किनवट हा तालुका जल, जंगल आणि जमीन या गोष्टींत परिपूर्ण असा तालुका आहे.

:रानमेव्यातून अनेक कुटुंबे आपला रोजगार मिळवतात; पण वातावरणातील बदल, कधी जास्त पाऊस, तर कधी पाऊस कमी यामुळे रानमेवा हाती लागणे दुरापास्त झाले आहे. उन्हाळ्यात मोहफुलांचा हंगाम धोक्यात आल्याच्या वृत्ताला वनविभागाने दुजोरा दिला आहे.

## संपादकीय....

# किशोरवयीन इंटरनेटच्या जाळ्यात

मुलांचा वाढता स्क्रीन टाईम हा सर्वच पालकांसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. अशा स्थितीत काही वेळा इंटरनेटचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. परिणामी, त्यांच्या ऑनलाईन घडामोडींवर देखरेख करण्यासाठी ॲप किंवा संकेतस्थळ आणण्याचे प्रयत्न होत असले, तरी इंटरनेटच्या मायाजालमधून त्यांना कितपत वाचवता येईल, हा प्रश्नच आहे.अलीकडच्या एका अहवालानुसार, भारतात इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय सध्या 'सेफनेट' ॲपवर काम करत असून ते ॲप पालक आणि पाल्याच्या फोनमध्ये कनेक्टिव्हिटी ठेवण्याचे काम करणार आहे. यामुळे मुलांच्या ऑनलाईन ॲक्टिव्हिटी पालकांपर्यंत पोहोचू शकतील. अशा प्रकारचे देखरेख करणारे ॲप किंवा संकेतस्थळ सुरू करण्याची परवानगी दिल्यानंतर मुले किती काळ ऑनलाईन राहतात, हे तपासण्याची व्यवस्था असेल. त्याचवेळी 'सेफनेट' हे यूट्यूबसारख्या साईटवर दाखविण्यात येणार्या सामग्रीची माहिती देण्याबरोबरच कॉल डिटेल्स आणि मेसेजही शेअर करेल, असे म्हटले जात आहे.इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर असोसिएशन ऑफ इंडिया यांनी मात्र हे ॲप सर्व ग्राहकांच्या फोनमध्ये डिफॉल्ट रूपातून असायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. मुलांची ऑनलाईन सुरक्षा हा कळीचा मुद्दा आहे आणि इंटरनेटच्या अतिवापरामुळे मुलांवर होणार्या दुष्परिणाबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे. अर्थात, मुलगा इंटरनेटचा वापर कसा करतो, कशासाठी करतो आणि का करतो, यानुसार त्याच्या प्रभावाचे आकलन करायला हवे; मात्र धोरणकर्त्यांच्या मते, प्रत्यक्षात दैनंदिन जीवनाप्रमाणेच आभासी जगातही लक्ष ठेवण्याचे कर्तव्य पालकांनी बजावले पाहिजे. अर्थात, या ठिकाणी काही बाबींचा विचारही करायला हवा.वास्तविक जगातही पालक मुलांपर्यंत पोहोचणार्या सर्व माहितींवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. एखादी गोष्ट किंवा घटना मुलाला कशी कळाली, हे ऐकून काही वेळा पालकांनाच आश्चर्याचा धक्का बसतो; कारण मुलांच्या मित्रांत सुरू असलेल्या चर्चेपासून पालक मंडळी अनभिज्ञ असतात. अशा स्थितीत ऑनलाईन जगात पालकांनी मुलांच्या सक्रियतेला लगाम घातला, तर संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता अधिक राहू शकते. बालमानसोपचारतज्ज्ञांच्या मते, पालकांचे लक्ष व मुलांची स्वायत्तता यांच्यात पुसटशी रेषा असून, ती ओळखणे गरजेचे आहे. खासगीपणा, गोपनीयतेवर हल्ला करण्यासाठी वापरण्यात येणार्या उपकरणांचा दुरुपयोग होण्याची शक्यता अधिक असते. विशेषत: कुटुंबात सापत्न व्यवहाराचा सामना करणार्या मुलांसाठी ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५'नुसार भारतात एक तृतीयांश महिला या जोडीदाराकडून कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडतात. अशावेळी पत्नीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बरीच मंडळी या उपकरणांचा वापर करतात. एवढेच नाही, तर या माध्यमातून मुलांच्या तुलेनत मुलींच्या दैनंदिन जीवनावरही नियंत्रण मिळवले जाऊ शकते, जसे आपण प्रत्यक्षातील जीवनात अनुभव घेत असतो.मुलांची ऑनलाईन सुरक्षा निश्चित करताना अनेक समस्यांना जन्म होऊ शकतो. त्यामुळे सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला सर्वात अगोदर कायद्यात सुधारणा करावी लागेल. उदा. आयटी अधिनियम २००० ची जागा घेणार्या नव्या भारतीय कायद्यात ब्रिटनच्या 'एज ॲप्रोपिएटेड डिझाईन कोड' (ज्याला आपण मुलांची संहिता म्हणतो) आणि 'द ओटिरोवा न्यूझीलंड कोड ऑफ प्रॅक्टिस फॉर ऑनलाईन सेफ्टी अँड हार्म्स' यासारख्या नियमांची तरतूद हवी. पूर्वीपासूनच उपलब्ध असलेल्या नियंत्रण उपकरणांना अधिक सक्षम करण्यासाठी ऑनलाईन घडामोडी, व्यवहार निश्चित करावे लागतील. तिसरे म्हणजे आपण शिक्षण संस्थांनाही या घडामोडीत सामील करून घेणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात पालक हे मुलाच्या 'स्क्रीन टाईम'वरून चिंतेत असतात व यासंदर्भात धोरण आखताना पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

# कमना काड्यांची मोळी घेऊन घरी आली. तिने अंगणातच भिंतीला

लागून मोळी ठेवली. आणि थबथबलेल्या घामाचा चेहरा पुसत दारावर बसली. उन्हामुळे ती तहानली होती. लुगड्याच्या पदराने तिने पुन्हा एकदा चेहरा पुसत तिच्या चौथ्या वर्गातील पोरीला हाक दिली,

वैशू पाणी आण वं बाई गडवाभर.

दोन्ही हातांनी पाण्याने भरलेला गडवा सांभाळत वैशाली आली. पाणी पिऊन गडवा बाजूला ठेवत तिने विचारलं,

तुझ्या बापाले दुपारी भात देला का नाई?

नाई

गडवा उचलून उरलेलं पाणी झटकत वैशाली उत्तरली

काऊन ?

कमनाने पुन्हा प्रश्न केला. पदराने वारा घालत जरा रागानेच म्हणाली ,

तुलेतं खेलावलेच सुदरत नसल .निस्ती लंगडीच खेलत राह्य दिवसभर.

आता खेळत होतो का रजने ?

जवळच उभी असलेल्या लहान बहिणीकडे बघत आपली निर्दोष सुटका करून घेण्यासाठी वैशालीने विचारलं. रजनीच्या रूपाने तिने पुरावा सादर पुरावा सादर केला. लहान रजनीने मानेनेच खेळत नसल्याची साक्ष दिली .

मंग भात काऊन नाही देलातं?

बाबा का नाही काय बाई बोलते

काय बाई मणजे ?

वैशीची मावशी मेली. अर्ध गाव जरलं असा गीसा काइ मणते .

वैशालीने दिलेली माहिती ऐकून तिला जरा विचित्र वाटलं . ती भयमिश्रीत आश्चर्याने तडाक उठली .आणि तरातरा घरात गेली. तिने किसनच्या अंगावरची घोंगडी उचलून विचारलं ,

काऊन वैशालीच्या बापा काऊन कसं लागून राह्यलं ?

तिने कीसनच्या कपाळावर हात ठेवला. ताप वगैरे नसल्याची खात्री करून घेतली . हलवून जागवत म्हणाली,

काऊन ? कसं लागून राह्यलं?

बेस लागते नं. मले दुपारची मटन देजो बरं. आता कामानाला अधिकच घाबरल्यासारखं वाटलं. आजपर्यंत किसन असा कधीही बोलला नव्हता. पण तिने हिमतीने पुन्हा विचारलं .

काऊन असं काई बाइ बोलता? कोटची मटण अनं कोटचं काय? दुपारी तर तुम्ही जेवलेच नाई.

जेवलो मटण भात .

इतक्यात १५/१७ वर्षांची किसनची चुलत बहीण यमु आली. तिच्याकडे बघून किसन म्हणाला'

ईलेच इचार. इनचतं वाढलन. यमुच्या लक्षात हा काय प्रकार आहे ते येईना. ती नुसतीच प्रश्नार्थक मुद्रणं कमना आणि किसन कडे बघत राहिली. त्याच प्रश्नार्थक मुद्रेने कमना सुद्धा किसन आणि यमुकडे बघत राहिली. मग यमुनेच विचारलं,

काऊन जी वयनी, भाऊ असा काउन बोलून राह्यला ?

मले बी काई समजून नाही राहिलं . मी दिवसभर वावरावरच होतो .

काउनगा भाऊ कायले खोटं बोलून राह्यलास ?

मी कायले खोटे बोलू ?

खोटा नाईतं काय बोलून राह्यलास. मी कवर तुले वाढलो ?

किसन अधिकच बावरला म्हणाला ,

थुतकाळी कोटची! मलेच आता ईचारून राह्यली कवर वाढलो म्हणून? दुपारी बकरा कापला अनं तुमच्या घरी मटन नाइ घेतल्या का तुम्ही? मले अनकी थोडीशी मटण आण बरं .

त्याने कमनाला हुकूम केला.

मले या माणसाचं मोठं नवल येते माय! काय झोंबलंय ते आले ?

कमना काहीशा वैतागाने बोलली.

लमडीचे मले काय झोमलंतं दाऊ का तुले..

त्या सरशी तो तडक उठला . तरातरा कोपऱ्यात कडे धावला .तूतारी उचलली .आणि कमनाच्या अंगावर धावू लागला. हा सगळा प्रकार यमू आणि कमना उघड्या डोळ्यांनी बघत होत्या. दोघींच्या चेहऱ्यावर प्रचंड आश्चर्याचे भाव होते. कारण अशक्तपणामुळे तो गेल्या दीड एक महिन्यात आधार दिल्याशिवाय धड उठूही शकत नव्हता .त्याच्या अंगात आलेलं बळ निश्चितच आश्चर्यचकित करणारं होतं. कामाच्या मनात एकदम भुताखेता विषयीचे विचार आले .नव्हे, तसा ठाम विश्वास झाला.आपला नवरा आपल्याशी बोलत नसून भूतच बोलत आहे असं तिला वाटलं. भूत आत्मा ह्या कल्पनेने डोक्यात घर केल्याने अंगावर धावून येणाऱ्या किसनला कमनाने जोरदार धक्का दिला. किसन तुतारी सकट खाटेवर चित झाला. हीच संधी साधून ती बाहेर पडली. कीसनच्या अशक्तपणाची कमनाने जराही दखल घेतली नाही. खाटेवर पडलेल्या किसनचं काय झालं असेल वगैरे विचार करण्यासाठी तिला सवडच नव्हती. यमुने एकदा मागे वळून बघितलं. पण नुकताच घडलेला अनुभव तिच्या स्मृतीत जमा होता. दोघीही अंगणात आल्यावर कोणी दिसतो का याचा शोध सुरू झाला. परंतु लहान मुलांशिवाय बाहेर कोणी नव्हते. तिच्या दोन्ही मुली केव्हाच घराबाहेर पडल्या होत्या. आणि बेफिकीरपणे खेळत होत्या. दोघींनी शेजारच्या गणेशचं घर गाठलं

आये का गणेश बापू ?

उत्तरा दाखल साठसत्तर वर्षांची गणेश बापूची मातोश्री बाहेर आली. कमनाकडे बघत तिने विचारलं ,

काय हो सुनबाई ,काऊन बावरल्या वाणी ,घाबरल्या वाणी करून राहिली?

गणेश बापूला पाठवा बरं

तो जेवून राह्यला. काय झालं ते सांग नं मले.

काय सांगू माया करमाची गोटे! वैशीचा बाप कसानं कसाच करते .

कमनाने क्रमवार सगळी कहाणी सांगितली. शेवटी भुत झोंबलं असल्याचं आपलं मतही नोंदवलं . तोपर्यंत गणेश बापू हा तरुण जेवण आटवून ढेकर देत बाहेर आला. त्याने जेवत असताना आतून सगळं ऐकलं होतं .कमरेवरची लुंगी सहिल करून पुन्हा बांधत तो विज्ञान युगात वावरत असल्याच्या आव आणत म्हणाला,

बह्यताड कुठच्या! कुठचा भुत कुठचं काय ?

त्याच्या एकविसाव्या शतकातील वक्तव्यावर गणेशबापूची मातोश्री प्रचंड आक्षेप घेत म्हणाली,

तुमी आजकालचे पोरं कोणतीच गोष्ट लागू देत नाई.

मग तिने उदाहरण म्हणून भुताखेतांचे दोन-चार उदाहरण सांगितले. आणि भूतांपासून मुक्ती कशी मिळाली याचं मसालेदार वर्णन केलं . कमना आणि यमुनाने आपलाही विश्वास असल्याची कबुली दिली. तेव्हा किसन या प्रकारात मोडतो का हे तपासून घेण्यासाठी गणेश बापूची मातोश्री, कमना, यमु आणि मागोमाग गणेश बापू प्रस्थान करू लागले. बाहेरच्या छपरातील किसन तुतारी धरून मघासारखाच स्वतःशी बरळत बसला होता . गणेशच्या मातोश्रीने हिम्मत करून विचारलं,

मले वळखता का ?

हो ओळखतो ना

कोण होय मी ?

गण्याची माय.

अनं हे ?

यमी

अनं हे ?

कमनाकडे बोट दाखवून तिने विचारलं

माही घरवाली

काय नाव आहे ईचं?

कमनी

इथपर्यंत बरोबर होत. पण तो खाटेवरून कसा उठला या प्रश्नाचं उत्तर तेवढं सापडत नव्हतं . म्हणून शेवटी भूत फसव्या असतो तो खोटंही बोलतो. माणूस नावाच्या बुद्धिवान प्राण्याला चक्रावून सोडण्यासाठी सगळं बरोबर सांगतो असं सर्वांचं एकमत झालं. यावेळी गणेश बापू नव्हता इतक्यात त्याने चार-पाच पोरांसह किसन निवासात प्रवेश केला. तिघांनीही आता कसं करायचं? या अर्थाने गणेश बापू आणि पार्टीकडे पाहिलं. तोंडातील खर्रा पचकन थुंकत गणेश बापून विचारलं ,

काउन गा किसन भाऊ कायले असा घाबरून राहिला सर्वाईले?

त्याचा सवाल संपते न संपते तोच इतर पोरांनीही किसनवर प्रश्नांचा भडीमार केला त्या सर्वांच्या प्रश्नांना एकाच वेळी उत्तर देणे किसनला कठीण होऊन गेलं. तो कमीला कमालीचा गोंधळला. पण त्याची मानसिक स्थिती कोणीही लक्षात घेत नव्हता . अशा वेळी भरपूर शिव्या हासडण्याशिवाय किसन कडे दुसरा पर्याय नव्हता. शिव्यांचं शस्त्र उगारत तो म्हणाला,

भोसडीचेहो मले काय बया बनवून राहिल्या का तुमी. मी पेलतो का तुम्हाले? जाता का नाई आपापल्या घरी .

हातातील तुतारी फिरवत तो दोन हात करायला तयार झाला. तेव्हा गणेश बापूची मातोश्री, कमना आणि मारते का बाई याईले म्हणत किसनच्या हवेवर फेरफटका करीत असलेल्या तुतारीकडे बघू लागल्या. आणि अगदी त्याचवेळी जमा झालेल्या तरुणांपैकी एकाने रस्त्याकडे काही अंतरावर बघत बाबुराव पोटफोडे येत असल्याची सूचना दिली .सगळ्यांनी रस्त्याकडे बघितलं. सर्वांच्या डोळ्यांनी एकच दृश्य टिपलं. ते दृश्य म्हणजे दुसरं तिसरं काही नसून बाबुराव पोटफोडे स्वतःचा तोल सांभाळत झोकांड्या देत होता . बाबुरावच्या आगमना सोबत मदिरेचा वास संपूर्ण किसन निवासात पसरला. गणेश बापूच्या मातोश्रीने त्याचं स्वागत केलं. अधिक वेळ न दवडता पोटफोड्या सरळ किसन कडे वळला. आणि भूत नावाच्या रोगाला वैद्य नावाचं औषध मिळाल्याने सर्वांची धास्ती कमी झाली. बाबुराव पोटफोड्याने पोटभक्ती सुरू केली. त्याने किसनच्या डोक्याचे मूडभर केस घट्ट धरले आणि हिजडा देत म्हणाला ,

चल सांग नाव.

किसन किसन उत्तरला

अबे आपलं नाव सांग.

केसांना जोरदार हिसडा देऊन पोटफोड्या ओरडला.

किसन किसन ने पुन्हा जुनंच उत्तर दिलं .

असा नाही सांगणार हा भडवा म्हणत बाबुरावने जोरदार चपराक किसनच्या कपोल मैदानावर ठेवून पुन्हा हात उचलला. तशी कमना असह्य वेदनेनं आडवी झाली. जणू तिलाच लागल्यासारखं ती कळवळत म्हणाली,

मारू नोका जी बापा मारून जाईल मोळकातोळका आये तरी आधार आहे माह्या नवरा .

अजी त्याले लागतच नाईनं तुम्ही कायले घाबरता. हा सपा मार याच्या अंगातल्याने लागून राह्यला.

पोटफोड्याने समजावलं. गणेश बापूच्या मातोश्रीने कमनाला ओढलं. त्याने पुन्हा फोडभक्ती सुरू केली. हाडांचा सांगाडा असलेला किसन मार खाऊन किती खाणार होता. शेवटी बाबुरावच्या दणक्याने त्याला अपेक्षित उत्तर मिळालं. पोटफोड्याचा सणसणीत हात किसनच्या कानाखाली बसला. तसा किसन तंगड्या वर करून पडला. त्याला उचलून पुन्हा मारण्याचा पवित्रा घेत तो म्हणाला,

सांग खरं आता

मुंज्या

क्षणाचाही विलंब न करता किसन झटकन उत्तरला. किसनच्या तोंडून ' ' ' मुंजा 'शब्द एकटाच बाबुराव पोटफोड्याने म्हाताऱ्याकोताऱ्यांकडे बघत , जवान पोरीईले बाहेर पाठवा . अशी अतिशय धोक्याची सूचना दिली. ती सूचना लगेच विचारात घेतली. तरुण पोरी उठून तरातरा पळू लागल्या. यमी दारात जाऊन थांबून पाहू लागली तिच्यावर खेकसत पोटफोड्या म्हणाला, ऐ लगन मोडे चल हो बाजूले . तशी यमी जरा वरमुन बाजूला झाली. त्यामुळे तरुण पोरांच्या ओठावर हशा पिकला. हसणाऱ्या पोरांकडे बघत पोटफोड्या पुन्हा खेकसत म्हणाला



कायले हासून राहिल्या बे पोरीबारा वाणी. किसनले सोडून तिले धरलं मणजे मग? याले काय आये वारा भई वारा! दरवाज्यातून जाता जाता तिले झोंबलातं. मुंज्या मणजे काय सादासुदा भूत वाटते का तुमाले?

हे ऐकूण साऱ्यांच्या तोंडावरचं हसू करपलं. बाबुराव किसन कडे वळून म्हणाला,

सांग, या बालकाले कायले धरला? (किसन नावाच्या जवान बालकाला बरं का)

कारण मले कोंबडं भेटलं.

किसन उर्फ मुंजा म्हणाला.

कोणं दिला बे ?

मंगऱ्यानं.

कुठी राहतो तू?

शाळेतल्या पिंपरावर

हे वाक्य किसनच्या तोंडून निघताच चार वर्षांपूर्वी दारू पिऊन शाळेच्या समोर मरून पडलेल्या मुराऱ्याची आठवण ताजी झाली. तेव्हा एका बुढीने

घुबड कुवाराकाच मेला अनं मुंजा झाला असा शेरा दिला. गणेश बापूच्या मातोश्रीने आपली संमती दिली. काही काही मुंज्याभुत फार कट्टर व खतरनाक असल्याची माहिती दिली. आता याले सोडतं नाही का नाई?

बाबूरावने दमदाटी केली.

नाई

भडव्या मी तुह्या बाप आये.

पिळदार मिशीवर ताव देऊन पोटफोड्या बावरला .त्याचा अवतार बघून किसन उर्फ मुंज्या म्हणाला,

ठीक आये. सोडतो.

पक्का ? दुसऱ्याहून इकडे दिसू नको.

नाईत...

इथपर्यंत पोटफोड्याचा उपचार झाल्यानंतर बघ्यांयांच्या गर्दीतील किसन कुटुंबाच्या अज्ञात शुभचिंतकाने दारूची बाटली गणेश बापूच्या मातोश्री कडे दिली .गणेश बापूच्या मातोश्रीने ती बाटली बाबुराव पोटफोडे कडे अशी दिली की तो प्रसंग बघून एखाद्या स्टेजवरील सत्कार सोहळ्याची आठवण व्हावी. बाटली मिळाल्याचा आनंद मनात कोंबून ती रिकामी करण्यासाठी पोटफोड्या स्थळ शोधू लागला. इतक्यात मोटर सायकलचा आवाज आला. थेट किसानच्या अंगणात येऊन मोटरसायकलचा आवाज बंद झाला. मागे डॉक्टरची बॅग धरून बसलेला एक तरुण उतरला. डॉक्टरांनी गाडी टेकली .

कुठे आहे पेशंट..

असे विचारत डॉक्टर दोन पावलं पुढे सरकला. तेव्हा कमनाने जुजबी प्रश्न केला,

बाप्पा डॉक्टरले कोणं बोलावलं ?

मी

गणेश बापू चा आवाज आला.

त्याची काय गरज ?

वहिनी आता ते आलेच तर पाहू द्या ना ते काही मारणार थोडीच आहेत किसन भाऊले.

उपस्थित बघ्यांनी गणेश बापूच्या मताला एकमुखी दुजोरा दिला. तेव्हा कमनाने आपली हरकत मागे घेतली. डॉक्टरांनी सर्वप्रथम रक्तदाब तपासला. एकूण तपासणी करून शेवटी शास्त्रीय कारण सांगितलं. ते असं, किसन टीबीचा पेशंट असल्याने तो दिवसेंदिवस खंगत गेला .औषधांचा योग्य पुरवठा न झाल्याने त्याच्या प्रकृतीत सुधारणा होण्याऐवजी प्रकृती आणखीच ढासळत गेली .अशा वेळी तो एकांतात विचार करू लागला की आपल्याला कुणीतरी भुताकटी केली असावी .आणि तीच बाब त्याच्या मनात घर करून बसल्याने तो स्वतःशीच बडबत बसला. अशा प्रकारे समजावून सांगितल्याने सर्वांना ते मत पटलं जमलेले लोक कुठचा मुंज्या न कुठचा काय म्हणत आपापल्या घरी परतू लागले. नुकतेच भुतकाळात जमा झालेले क्षण आठवून हसू लागले. किसनलाही पूर्ण होशा आला.

मले काई आठवत नाई म्हणत तो कमनाकडे बघू लागला. डॉक्टरने औषधाची यादी मिश्रित बिल असलेला हात पुढे केला. हातातील बिल निरखुन तिने विचारलं,

किती झालं जी बिल ?

फक्त चाळीस रुपये

पाहिलं तुमचा मुंज्या लय महागात गेला म्हणत तिने किसन कडे पाहिलं. आणि खुदुखुदुर हसू लागली .तेव्हा बघ्यांची गर्दी बरीच कमी झाली होती.

-*******

राजू बोरकर
७५०७०२५४६७
मु. पो. ता. लाखांदूर
जि. भंडारा

# रक्षकच भक्षक?

ज्याच्यावर विसंबून रहावे त्यानेच दगाफटका करावा, रक्षकानेच पाठीत खंजीर खुपसावा असा काहीसा प्रकार कोविड लसीसंदर्भात झालेला दिसतो. कोरोना महामारीच्या काळात कोविशिल्ड लस जीवदान देणारी वाटत होती परंतु तीच लस तुमच्या जीवावर उठू शकते असे आज सांगितले जात आहे. हा सारा प्रकार धक्कादायक आहे. कोरोनावरील कोविशिल्ड लसीमुळे अतिशय दुर्मिळ प्रकरणांत रक्तामध्ये गुठळ्या होणे, प्लेटलेट्स कमी होणे यासारखे काही गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात, अशी कबुली ब्रिटिश औषध उत्पादक कंपनी ॲस्ट्राझेनेकाने ब्रिटनच्या न्यायालयात दिली आहे. रक्ताच्या गुठळ्या तयार होणे, प्लेटलेट्स कमी झाल्याने हृदयविकाराचा झटका, ब्रेनस्ट्रोकचा धोका निर्माण होऊन प्रसंगी मृत्यूदेखील ओढवू शकतो अशी कबुली कंपनीने दिल्याने जगभरात खळबळ माजली आहे. मात्र, हे दुष्परिणाम नेमक्या कोणत्या कारणामुळे होऊ शकतात ते सांगता येत नाही असेही कंपनीने म्हटले आहे. ॲस्ट्राझेनेका आणि ऑक्सफोर्ड विद्यापीठाने विकसित केलेल्या कोविशिल्ड लसीचे पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने उत्पादन केले होते आणि भारतातील कोरोना लसीकरण कार्यक्रमात या लसीचा सर्वाधिक वापर करण्यात आला होता. ब्रिटिश न्यायालयात ॲस्ट्राझेनेकाविरोधात ५१ दावेदारांनी खटला दाखल करून सामूहिक कारवाईची मागणी केली होती. त्या खटल्याच्या संबंधात कंपनीने फेब्रुवारीमध्ये लंडन हायकोर्टात वरीलप्रमाणे दस्तावेज सादर केल्याचे वृत्त 'द डेली टेलिग्राफ'ने दिले आहे. ब्रिटनमध्ये ही लस ॲस्ट्राझेनेका 'वॅक्सझेव्हरिया' या नावाने तर भारतात 'कोविशिल्ड' या नावाने ओळखली गेली. या लसीमुळे क्वचित प्रसंगी टीटीएस (थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोमसह थ्रोम्बोसिस) आजार होऊ शकतो. याबरोबरच टीटीएस हा एझेड लसीच्या अभावानेही होऊ शकतो. खटला दाखल केलेल्या ५१ दावेदारांपैकी १२ जणांच्या नातेवाईकांचा लस घेतल्यानंतर मृत्यू झालेला आहे. कंपनीने म्हटले आहे की, आम्ही सर्व मानकांचे पालन केले आहे. ज्यांनी आपल्या कुटुंबीयांना गमावले त्यांच्याबद्दल आम्हाला संवेदना आहे. रुग्णांची सुरक्षितता ही आमची प्राथमिकता आहे. आमचे नियामक सर्व औषधे व लसींच्या सुरक्षित वापराच्या सर्व मानकांचे पालन करत आहोत. क्लिनिकल चाचण्या व अन्य देशातून मिळालेल्या डेटामधून हे सिद्ध झाले की, आमची लस सुरक्षेशी संबंधित सर्व मानकांचे पालन करते.या लसीमुळे होणारे फायदे हे त्याच्या दुष्परिणामांपेक्षा अधिक आहेत. या लसीमुळे रक्तात गुठळ्या होऊन मृत्यू झाल्याची ८१ प्रकरणे आहेत. दुष्परिणामांचा त्रास झालेल्या पाचपैकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. भारतात कोविशिल्ड लसीचे १७५ कोटी डोस दिले गेले आहेत. ॲस्ट्राझेनेका कंपनीने इंग्लंडमधील न्यायालयात कबुली दिल्यानंतर त्याचे पडसाद भारतात उमटणे साहजिक होते. कोविशिल्ड लसीच्या दुष्परिणामांची तपासणी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती बनवण्याचे आदेश देण्यात यावेत, तसेच कोविशिल्डमुळे गंभीर आजार झाल्यास नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली. ॲड. विशाल तिवारी यांनी ही याचिका दाखल केली आहे. कोविशिल्ड लसीच्या कथित दुष्परिणामांविषयी केंद्र सरकारने त्वरित खुलासा करावा, अशी मागणी दिल्लीचे आरोग्यमंत्री सौरभ भारद्वाज यांनी केली. कोविशिल्डच्या सुरक्षेबद्दल शंका असल्यामुळे २०२१च्या सुरुवातीला जर्मनी, फ्रान्स, स्पेन, फिनलँड, नॉर्वे आणि डेन्मार्क यांच्यासह अनेक युरोपीय देशांमध्ये त्यावर बंदी घातल्याचा दावाही त्यांनी केला.कोरोनावरील लसीचे दुष्परिणाम होऊ शकतात अशी चर्चा कोरोना महामारीच्या काळात जगभर मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे बरेच वादंग माजले होते. कोरोनाची लस घेतल्यानंतर काहींना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. मात्र, दुष्परिणाम होऊ शकतात हे कुणी मान्य करायलाच तयार नव्हते. या लसीच्या भारतीयांच्या आरोग्यावरील दुष्परिणामांसंबंधी हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटलचे न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी म्हटले आहे की, लसीचे दुष्परिणाम शक्यतो लस घेतल्यानंतर एक ते सहा आठवड्यांदरम्यान दिसू शकतात.

# गुजरात मधून कांदा निर्यात केला जातो, मग महाराष्ट्रातून व इतर राज्यातून का केला जात नाही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

## शिरूर अनंतपाळ शहरातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न

ज्येष्ठ नागरिक धोंडू भीमराव धुमाळे वय वर्ष ८७ वर्ष असतानाही त्यांनी काँग्रेसच्या जाहीर सभेत काँग्रेसने ७० वर्षात देशाचा केलेला विकास सांगितला आणि उपस्थित यांना काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांना मतदान करण्याचे आवाहन केले.

शिरूर अनंतपाळ येथील भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला, यावेळी आमदार देशमुख यांनी त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सोशल मीडिया सेलचे सरचिटणीस तथा लातूर जिल्हा काँग्रेस माध्यम विभागाचे जिल्हाध्यक्ष हरिराम कुलकर्णी यांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

लातुर प्रतिनिधी : दि. ३ मे २०२४ गेल्या दहा वर्षात भाजपने जनतेची फसवणूक केली. शेतीमालाला भाव दिला नाही, शेतकऱ्यांच उत्पन्न दुप्पट केले नाही, आनंदाच्या शिधात पाम तेल दिले, मग कसा भाव भारताच्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळेल असे सांगून गुजरात मधून कांदा निर्यात केला जातो, मग महाराष्ट्रातून व इतर राज्यातून का केला जात नाही, असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विचारले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरूवार दि. २ मे रोजी दुपारी शिरूरअनंतपाळ शहरातील महात्मा बसवेश्वर चौक येथे लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, सरचिटणीस मोईज शेख,सचिव अभय साळुंके, लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष संजय शेटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लिंबन महाराज रेशमे, शोभताई बेंजरगे, निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक संतोष देशमुख, लातूर जिल्हा काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ अरविंद भातांबरे, माजी सभापती अजित माने, शिरूर अनंतपाळ तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आबासाहेब पाटील उजेडकर, एल बी आवाळे, हरिभाऊ गायकवाड, हरिराम कुलकर्णी, सुतेज माने, भागवत वांगे, बसवराज मठपती, मोहनराव



भोसले, सरोजाताई गायकवाड, माणिक गायकवाड, बाबुराव धोंडे, चक्रधर शेळके आदींसह काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोरोना संकटकाळात वैदयकीय शिक्षणमंत्री म्हणून सर्वोतोपरी सहकार्य केले आमदार अमित विलासराव देशमुख कोरोनाचे संकट खुप मोठे होते. या कठीण काळात आपण सर्वांनी कोरोना संकटावर मात केली. राज्यात कोरोना काळात भिषण परिस्थिती होती. या काळात मी वैद्यकीय शिक्षण मंत्री असताना शिरूर अनंतपाळ आणि या परीसरात विशेष लक्ष दिले. येथील आरोग्य व्यवस्थेची आम्ही पाहणी केली, आढावा घेतला. येथे आवश्यक आरोग्यसुवीधा तातडीने पुरवील्या, कोरोना संकटावर मात करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. येथील आरोग्यसेवेला सर्वोतोपरी सहकार्य केले आणि अनेकांचे प्राण वाचवण्यात यशस्वी ठरलो, असे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगीतले. यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले की, लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे शिरूर अनंतपाळ तालुक्याचे भूमिपुत्र आहेत भाजप खासदार आहेत पाच वर्षात येथे ते फिरकलेच नाहीत. देशभरात लोकसभा निवडणूक निमित्ताने नव्या भारताची संकल्पना काँग्रेस नेते राहुल गांधींनी मांडली आहे, अनेक जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने वास्तव्य करत असलेला असा आपला भारत देश आहे. आता मतदारानी महाविकास आघाडीला राज्यात व देशात इंडिया आघाडीला विजयी करण्याचा निश्चय केला आहे, असे त्यांनी सांगितले. देशात इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे असे स्पष्टपणे दिसत आहे. गेल्या दहा वर्षात भाजपने जनतेची फसवणूक केली, शेतीमालाला भाव दिला नाही, शेतकऱ्यांच उत्पन्न दुप्पट केले नाही, आनंदाच्या शिधात मलेशिया इंडोनेशियाच पाम तेल दिले, जाते मग कसा भाव भारताच्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाला मिळेल असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की गुजरात मधून कांदा निर्यात केला जातो, महाराष्ट्रातून व इतर राज्यातून का केला जात नाही. केंद्र सरकारची धोरणे गुजरातधार्जनी आहेत. आम्ही शिरूर अनंतपाळ तालुक्याचा विकासाचा बॅकलॉग भरुन काढू, निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार यांनी मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीत ५००० तरुणांना रोजगार देणार असे म्हणून त्यांची नावे गोळा केली अजून पर्यंत त्यांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत, त्यांची फसवणूक केली. महात्मा बसवेश्वर यांची जयंती शासकीयस्तरावर साजरी करण्याचा निर्णय लोकनेते विलासराव देशमुख यांनी घेतला. त्यानंतर तो कर्नाटक सरकारने निर्णय घेतला, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचे रक्षण करण्यासाठी उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांना निवडून द्या आपला उमेदवार डॉक्टर आहे तर भाजप उमेदवार कंत्राटदार आहे. डॉक्टर काळगे यांची मतदारसंघात हवा आहे या निलंगा विधानसभा मतदारसंघातून डॉक्टर काळगेना सर्वाधिक लीड द्या असे सांगून, येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर म्हणाले की, काँग्रेस पक्षाने देशाचा विकास केला लातूर जिल्ह्याचे नेतृत्व माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांनी करून जिल्ह्याचा विकास केला काँग्रेसने नैसर्गिक आपत्तीत जनतेला मदत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने १५ लाख रू नागरिकांना देतो म्हणाले ते दिले नाहीत. शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही, दोन कोटी बेकारांना नोकरी दिल्या नाहीत, भाजप दहा वर्ष देशाला मागे घेऊन गेले आहेत. भाजपने जाती–जातीत भांडणे लावली, धनगर मुस्लिम लिंगायत समाजाला त्यांनी आरक्षण दिले नाही. महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांनी स्वतः उमेदवार आहेत, असे समजून प्रत्येकाने काम करावे आता ही शेवटची निवडणूक व शेवटचा मतदानाचा अधिकार आहे भाजप संविधान बदलणार आहे असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, शोभाताई बेंजरगे, अजित माने, संजय शेटे, मोइज शेख यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संजय बिरादार यांनी केले तर शेवटी आभार सुतेज माने यांनी मानले.

## आरटीई अंतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस १०मे पर्यंत मुदतवाढ. मुंबईत १३८३ पात्र शाळेमध्ये २९ हजार ०१४ जागा उपलब्ध.

मुंबई/ शहामत शेख :– शिक्षण हक्क अधिनियम अर्थात आरटीई अंतर्गत महापालिका सरकारी खाजगी प्राथमिक शाळेत २५% आरक्षित जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया १६ एप्रिल २०२४ सुरू झाली आले. याची शेवटची मुदत ३० एप्रिल पर्यंत होती या प्रक्रिया शिक्षण विभागातर्फे १० मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश अर्ज करावे. असे आव्हान महानगरपालिका शिक्षण विभागा वतीने करण्यात आले आहे आरटीई अंतर्गत दुर्बल वंचित शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास घटकाकरिता विद्यार्थ्याच्या घरापासून एक किलोमीटर अंतरावरील खाजगी शाळेत २५ टक्के आरक्षित कोट्यातून मोफत प्रवेश दिले जातात. मुंबईतील १३८३ पात्र शाळेत २९ हजार ०१४ जागा शिक्षक हक्क अधिनियम अंतर्गत प्रवेश करिता उपलब्ध आहे. या प्रवेशाकरिता पालकांना महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळास भेट द्यावे.

## एम.पी.डी.ए. अंतर्गत लातूर जिल्हा पोलीसांची नववी कारवाई

लातूर :– वाढत्या गुन्हेगारीला लगाम लावण्यासाठी तसेच लोकसभा निवडणूक–२०२४ व मतदान प्रक्रिया अनुषंगाने पोलीस ठाणे एमआयडीसी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा (एमपीडीए) कायद्यांतर्गत लातूर शहरातील सुभेदार रामजी नगर परिसरात राहणारा स्वप्निल उर्फ पन्या गौतम कांबळे, वय २४ वर्ष याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचा शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणार्या गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी व त्यांची गुन्हेगारी रोखण्यासाठी लातूर पोलिसांकडून कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. स्वप्निल उर्फ पन्या गौतम कांबळे याला 'एमपीडीए' कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबद्ध करुन त्याची रवानगी नाशिक कारागृहात करण्यात आली आहे. पोलीस अधिक्षक श्री. सोमय मुंडे यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील एमपीडीए नुसार करण्यात आलेली ही नववी कारवाई आहे.

कुख्यात गुन्हेगार स्वप्निल उर्फ पन्या गौतम कांबळे, याच्या विरुद्ध जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यामध्ये अत्यंत गंभीर स्वरूपाचे एकूण १३ गुन्ह्यांची नोंद असून त्यामध्ये शस्त्रासह शरीराविरुद्ध, जबरीने मालमत्ता चोरी करण्याचे गुन्हे, मालमत्ता चोरीचे गुन्हे ,भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे, असे एकूण १३ गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत.

जनसामान्यात त्याची भीती होती. त्याच्याकडून सार्वजनिक शांततेस धोका असल्याने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे निर्देशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,(लातूर शहर) भागवत फुंदे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांचे नेतृत्वात एमआयडीसी पोलिस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक संदीप कराड, पोलीस अंमलदार विष्णू वायगावकर, गणेश मालवदे, भीमराव बिल्लाळे, अर्जुन राजपूत, युवराज गिरी,सिद्धेश्वर मदने, संतोष खांडेकर यांनी परिश्रम घेवून प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी यांचे कडे मंजूरी साठी पाठविला होता. व मंजुरी नंतर त्याची अंमलबजावणी केली आहे.

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर वर्षा ठाकूर घुगे यांनी त्याच्या स्थानबद्धतेचा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्यावरून सदर आरोपीची २६ एप्रिल रोजी नाशिक येथील कारागृहामध्ये रवानगी करण्यात आली आहे.

काय आहे एमपीडीए कायदा?

महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ,पायरसी) वाळू तस्कर व अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे गुन्हेगार यांच्या विघातक कृतींना प्रतिबंध करण्याविषयीचा कायदा सन १९८१ (सुधारणा १९९६, २००९ व २०१५) अंतर्गत स्थानबद्धतेचा आदेश म्हणजेच एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) होय.

## लोकसभा निवडणुकीच्या निमीत्ताने देशात दुसरी स्वातंत्र्याची लढाई महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रभारी रमेश चेन्नीथला

लातुर / प्रतिनिधी : – लोकसभा निवडणुकीच्या निमीत्ताने देशात दुसरी स्वातंत्र्याची लढाई आता होत आहे. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाचा सत्यानाश केला आहे, त्यांनी दिलेले एकही आश्वासन पाळले नाही. यामुळे देशातील जनता नाराज आहे यामुळे इंडीया आघाडीचा विजय निश्चीत आहे असे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे रमेश चेन्नीथला महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि. ३ मे रोजी दुपारी लातूर शहरातील मार्केट यार्ड येथे लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न झाली यावेळी ते बालेत होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष नाना गावंडे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, काँग्रेसचे लातूर लोकसभा निरीक्षक अमर जाधव, लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष संजय शेटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सुनीता चाळक, सर्जेराव मोरे, उदय गवारे, माजी सभापती ललीतभाई शहा, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे,अशोक गोविंदपूरकर विद्याताई पाटील सुभाष घोडके, अशोक (गट्टू) अग्रवाल, चंद्रकांत पाटील, तुळशीराम गंभीरे, बालाजी जाधव, अरुणा मोरे, आदींसह काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी,कार्यकर्ते आडते खरेदीदार गुमास्ता हमाल मापाडी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते विलासराव देशमुख माझे मित्र होते ते आम्हाला त्यांनी मदत केली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले की, देशात दुसरी स्वातंत्र्याची लढाई आता होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाचा सत्यानाश केला त्यांनी दिलेले एकही आश्वासन पाळले नाही. लोकनेते विलासराव देशमुख माझे मित्र होते ते केरळला आले होते, आम्हाला त्यांनी मदत केली. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वातूनलातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे विजय होतील असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. काँग्रेसने कर्नाटक तेलंगणात गॅरंटी कार्डची अंमलबजावणी केली विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशात आता इंडिया आघाडीचे सरकार येणार आहे. विदर्भातील व मराठवाड्यातील सर्व जागा महाविकास आघाडी जिंकणार असून मोदींनी दहा वर्षात सामान्य माणसासाठी काही काम केले नाही. काँग्रेसचा जाहीरनामा मोदी मोडूनतोडून सांगतात



काँग्रेसने कर्नाटक तेलंगणात गॅरंटी कार्डची अंमलबजावणी केली आहे, असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्रात सोयाबीनची राजधानी म्हणून लातूरची ओळख या उद्योगाला आपणाला वाढवायचे आहे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, भाजप खासदार कधीही मार्केट यार्ड येथे आले नाहीत, मार्केट यार्डचे प्रश्न त्यांनी सोडवले नाहीत, देशात व राज्यात आता बदल घडणार आहे. महाराष्ट्रात सोयाबीनची राजधानी म्हणून लातूरची ओळख आहे. या उद्योगाला आपणाला वाढवायचे आहे, महायुती सरकारने आरक्षणाचे राजकारण केले त्यांना धडा शिकवा. देशात व राज्यात भ्रष्टाचार फोफावला आहे, भाजपने पक्ष फोडले घर फोडले आमदार फोडले राज्यात महाविकास आघाडीची हवा आहे, त्या हवेचा अधिक जोर मराठवाड्यात आहे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, लातूर लोकसभेच्या भाजप उमेदवाराला अनेक गावात बंदी घातली गेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत, देशात लोकशाहीचे धिंडवडे निघत आहेत. भाजपने दोन लोकप्रिय मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये टाकले आहे. देशात आता बदल घडतोय त्या बदलात जनतेने सामील व्हावे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, माजी मुख्यमंत्री डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर, माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची परंपरा लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे पुढे सुरू ठेवतील महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनीही डॉक्टर काळगे यांचा संदेश सर्वदूर पाठवावा असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे माजी नगरसेवक अशोक गोविंदपुरगर यांनी मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावने यांनी केले तर सूत्रसंचलन संचालक सचिन सूर्यवंशी यांनी केले तर शेवटी आभार संचालक युवराज जाधव यांनी मानले.

## अच्छे दिन लातूर जिल्ह्यात मांजरा परिवार ने आणले भाजपाचे अच्छे दीन फक्त टिव्ही वर दिसतात



लातूर :– देश अराजकतेच्या परीस्थिती मधून जात आहे सत्तेवर असलेल्या भाजपा सरकारने १० वर्षात काय केले? पुढें काय करणार हे सांगत नाहीत फक्तं टिव्ही वर अच्छे दीन अशी जाहिरात आपल्याला दिसते आम्ही मांजरा साखर परिवाराने सुरवातीला १४०० रूपये भाव देत आता आम्ही २७०० ते २८०० रुपयांपर्यंत भाव देवुन जिल्ह्यातील शेतकरी सामान्य माणसाच्या आयुष्यात अच्छे दिवस आणण्याचे काम केले प्रत्यक्षात अनुभव आपण सर्व जण घेत आहात याला कल्याणकारी काम म्हणतात असे सांगून सत्तेवर असलेल्या भाजपा सरकारच्या काळात कुठलाच घटक मागच्या १० वर्षात समाधानी नाही अशा फसव्या भाजपा सरकारला धडा शिकवला पाहिजे व उद्याच्या लोकसभा निवडणुकीत उच्चविभूषित काँग्रेस आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांना प्रचंड बहुमताने या भागातून मताधिक्य द्यावे व त्यांना विजयी करावे असे आवाहन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले आहे ते लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील औसा तालुक्यातील भादा येथे लातूर लोकसभेचे काँग्रेस आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थं जाहीर सभा शुक्रवारी घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते यावेळी आमदार धीरज विलासरावजी देशमुख , माजी आमदार त्रिंबकजी भिसे आबासाहेब पाटील सेलुकर एडवोकेट श्रीपतराव काकडे, श्याम भोसले सचिन पाटील गणपतराव बाजूळगे, महेंद्र भादेकर अनुप शेळके शिवप्रसाद शिंदे, शेतकरी संघटनेचे राजकुमार सस्तापुरे, राजेंद्र मोरे आदी मान्यवर उपस्थित होते सत्ताधारी पक्षाकडून संविधान बदलण्याचा प्रयत्न यावेळी बोलताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले की देशाचा कारभार पाहिला तर हुकूमशहा पद्धतीनं सुरू आहे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले शेतीमालाला भाव नाही महागाई वाढवली पेट्रोल डिझेल गॅस दरवाढ केली महिलासुरक्षित नाहीत युवकांना रोजगार उपलब्ध नाही त्यामुळे अशा लोकांच्या हातात पुन्हा सत्ता देणार का? असा सवाल करत सध्या जो सत्ताधारी पक्षाकडून ४०० पार चा नारा सुरू आहे तो संविधान बदलण्यासाठी प्रयत्न करत आहेत त्यामुळे सर्वधर्म समभाव सर्वांना सोबत घेवून एकत्र देश ठेवण्याचे काम करणारा, देशासाठी बलिदान देणारे हे कोंग्रेसचे नेते होते या कॉंगेसच्या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख हे आपल्या भागात चांगले कार्य करीत आहेत या भागांतील २७ गावात अधिक मताधिक्य मिळेल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा निश्चितपणे विकासकामे होतील डॉ शिवाजी काळगे यांना आशिर्वाद द्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले विकासाच्या गप्पा मारणाऱ्या भाजपला धडा शिकवा आमदार धीरज देशमुख यांचे प्रतिपादन शेतकऱ्यांना वेळेवर पीक विमा मिळत नाही शेतीमालाला भाव नाही नुकसान भरपाई नाही या सत्तेवर असलेल्या भाजपा सरकारने लोकांशी धूळफेक केली आहे नुसत्या घोषणा केल्या प्रत्यक्षात कुठलीच मदत मिळाली विकासाच्या गप्पा मारत लोकांना जनतेची दिशाभूल करणाऱ्या भाजपा सरकारला लोकसभा निवडणुकीत धडा शिकवा काँग्रेसचे उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांना निवडून द्या आशिर्वाद द्यावेत असे आवाहन त्यांनी यावेळी केले यावेळी जिल्हा परिषद सदस्य धनंजय देशमुख नारायण लोखंडे चंद्रकांत पाटील रमाकांत पाटील, कुमार शिंदे, भालचंद्र पाटील, सचिन दाताळ, बसवेश्वर पाटील, खालिल सय्यद, राजीव कसबे आदी उपस्थित होते

# श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था आणि कार्यकारी मंडळातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न




लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर न्यासाच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे श्री. सं. क. कुलकर्णी (धर्मदाय सहआयुक्त, छत्रपती संभाजी नगर) यांच्या नियंत्रणाखाली दि. ०२/०५/२०२४ रोजी संस्थेच्या कार्यालयात संस्थेची निवडणूक संपन्न झाली. यामध्ये आदिनाथ बसवंतराव सांगवे यांची अध्यक्ष, तर माधवराव त्रिंबकराव पाटील (तपसेचिंचोलीकर) यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्यांचा आणि कार्यकारी मंडळाच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी शाल, पुष्प गुच्छ, स्मृतीचिन्ह आणि पेढे देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी राजेश्वर वैजनाथराव बुके, प्रदीपकुमार विश्वनाथप्पा दिंडीगावे, प्रभूप्पा शिवलिंगप्पा पटणे, बसवराज (राजू) गुरुपादप्पा येरटे, महेश वीरभद्रप्पा हालगे, बाबुराव विठ्ठलराव तरगुडे, ॲड. काशिनाथ गुणवंतप्पा साखरे, माधवराव हणमंतराव पाटील (टाकळीकर), सुनील सिद्रामप्पा मिटकरी, विजयकुमार नागनाथप्पा रेवडकर, प्राचार्य डॉ. बाबू खडकभावी, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कार्यालयप्रमुख आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असले पाहिजे. संस्था शैक्षणिक विकास प्रक्रियेमध्ये कुठेही हस्तक्षेप न करता संपूर्ण स्वातंत्र्य आपल्याला देईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला अनुसरून महाविद्यालयांमध्ये कौटुंबिक सम्यूपदेशन, स्वयंसेवी संस्था व्यवस्थापन, प्रशासनातील कला पदवी, व्यक्तिमत्व विकास आदी विविध नवनवीन अभ्यासक्रमाची आपण गुणवत्तापूर्ण आखणी करून त्याची गुणात्मक आणि परिणामकारक पद्धतीने अंमलबजावणी करावी. यासाठी संस्थेकडून आपल्याला सहकार्य केले जाईल असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी आभारपर मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, सर्वप्रथम नवनिर्वाचित संस्था व कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांचे महाविद्यालय प्रशासनातर्फे मनःपूर्वक हार्दिक स्वागत आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था, महाविद्यालय प्रशासन, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले पाहिजे यासाठी संस्थेचे सातत्याने मार्गदर्शन मिळाल्यास श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा चालणाऱ्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचा शैक्षणिक विकास हा जलद गतीने घडून येईल असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. राजकुमार लाखादिवे यांनी केले.

# मांडवी ग्रा.पं.चे लाचखोर ग्रामसेवक निलंबित

किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत) : लाच स्वीकारताना रंगेहात पकडलेले किनवट तालुक्यातील मांडवी ग्रा.प. अंतर्गत चिखली (खु) च्या ग्रामसेवकास लाचप्रकरणी रंगेहात पकडल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी त्यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित केले आहे.पोलीस निरीक्षक, लाचलुचपतसीईओ करनवाल. :यांची कारवाईप्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी प्रेमसींग मोतीराम आडे ग्रामसेवक, ग्रामपंचायत मांडवी अतिरिक्त पदभार चिखली (खु), पंचायत समिती, किनवट यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधात्मक कायद्याखाली भाग्यनगर पोलिस ठाण्यात गु.र.नं. १०४/२०२४ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये २४ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करुन अटक केल्याचा अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार ग्रामसेवक प्रेमसींग आडे यांना २४ एप्रिलपासून जिल्हा परिषद सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळात संबंधिताचे मुख्यालय पंचायत समिती हदगाव हे राहील. निलंबन काळात संबंधितास खाजगी नौकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही. तसेच गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही असे आदेशात नमूद केले आहे.

# गांजूर प्रकरणावरुण ॲड गणेश कांबळे यांना बुद्धभूषण पुरस्कार देऊन सन्मान

गांजूरप्रकरणातील६आरोपीची विना मोबदला नि : शुल्क )अटकपूर्वजामीन केल्या बद्दल समसापूर ( तालुका रेणापूर ) जयंती उत्सव समितीच्या वतीने ड्गणेशकांबळे यांना बुद्धभूषण पुरस्कार जाहीर.



लातूर :- मौजे गांजूर तालुका चाकूर येथे दिनांक २१- ३ -२०२४ रोजी बौद्ध समाजावर कलम ३९५ ३५४ २९४ १४३ १४७ १४८ १४९ ३२३ ५०४ ५०६ (दरोडा विनयभंग) असा खोटा गुन्हा नोंद करण्यात आला होता सदर प्रकरणांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर ॲड फोरमच्या वतीने प्रकरणातील निष्पाप लोकांची अटक पूर्व जामीनचा अर्ज दाखल केला होता तसेच ॲड गणेश मधुकर कांबळे यांनी सखोल अभ्यास करून तसेच भक्कम पुरावे सादर करून या प्रकरणातील आरोपीची बाजू मांडून युक्तीवाद केला होता तो मा न्यायलयाने मंजूर करून अटक पूर्व जामीन मंजूर केली होती तसेच या प्रकरणामध्ये एकही रुपये फीस न घेता विशेष विना मोबदला मोफत जामीन करण्यात आली होती सदरील जमिनीसाठी फोरमच्या सर्व सन्माननीय सदस्य यांनी सहकार्य केले यामध्ये ॲड सुभेदार मादळे, ॲड रोहित सोमवंशी ॲड रमेश गायकवाड ॲड धम्मपाल कांबळे यांनी सहकार्य केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय संविधानातील आणि भारतीय अर्थशास्त्रातील योगदान या विषयावर नॅशनल स्टॉक एक्सचेंज, मुंबई विद्यापीठ, सोबत बार्टीने घेतली राष्ट्रीय परिषद

पुणे -- दिनांक २ मे प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लंडन या ठिकाणी १३ आणि १४ एप्रिलला दोन दिवसाची आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली आणि त्यानंतर लगेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधान आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान या विषयावर नॅशनल स्टॉक एक्सचेंज मुंबई या ठिकाणी राष्ट्रीय परिषदेचे महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत बाबासाहेबांचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून जागतिक दर्जाचे कर्तुत्व डॉ नरेंद्र जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले. द प्रॉब्लेम ऑफ द रुपी इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन या प्रबंधाचा आधार घेत बाबासाहेबांचा अर्थशास्त्रज्ञ तसेच अर्थव्यवस्थापक म्हणून असलेला दृष्टिकोन त्यांनी आपल्या शब्दांत विशद केला. १९२७ नंतर बाबासाहेबांनी अर्थशास्त्रात जरी लिखाण केले नसले तरी संविधान निर्माण करत असताना जास्तीत जास्त आर्थिक तरतुदींवर बाबासाहेबांमधील अर्थशास्त्रज्ञाने भर दिलेला असल्याचे जाणवते असे मत डॉ नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.




आज रोजी दलाल स्ट्रीटवर उभ्या असलेल्या बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इमारतीच्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातून भारतात परतल्या नंतर १९१७ मध्ये स्टॉक अँड शेअर्स या कंपनीची स्थापना केली व शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक कशी करावी यासंबंधी सल्ला देण्याचे कामकाज केले असे अभिमानाने नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना सांगितले. यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ रवींद्र कुलकर्णी, गोखले इन्स्टिट्यूटचे कुलगुरू डॉ अजित रानडे, खउउ-- चे संचालक सुनिल झोडे यांनीही मार्गदर्शन केले. चार सत्रांमध्ये झालेल्या या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेस विविध मान्यवरांनी आपला सहभाग नोंदविला. सर्व मान्यवरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा व मराठी अनुवादित द प्रॉब्लेम ऑफ द रुपी हे पुस्तक भेट देऊन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी सन्मानित केले. तसेच यापुढेही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय कार्यांना उजाळा देण्याचे कार्य बार्टी मार्फत सुरू ठेवणार असल्याचे प्रतिपादन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी केले.

# मतदाना दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस अगोदर वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या राजकीय जाहिरातींचे प्रमाणीकरण बंधनकारक

लातूर, दि. ०३ : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाने राजकीय प्रचार जाहिरातींबाबत नियमावली ठरवून दिली आहे. यानुसार उमेदवारांनी दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यासाठी लातूर जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समिती (एमसीएमसी) कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. समिती कक्ष बार्शी रोडवरील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर कक्ष क्र. २१० येथे येथे स्थापन करण्यात आला आहे. उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या किमान तीन दिवस अगोदर प्रमाणिकरणासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. विहित नमुना एमसीएमसी कक्षात उपलब्ध आहे. एमसीएमसी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांत अर्ज निकाली काढण्यात येतील. जाहिरात नियमानुसार नसल्यास एमसीएमसी समितीला प्रमाणीकरण नाकारण्याचा किंवा बदल सुचविण्याचा अधिकार आहे. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन जाहिरात सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणिकराणासाठीचा अर्ज विहित नमुन्यात सादर करावा. त्यात जाहिरात निर्मिती खर्च, जाहिरात प्रसारण खर्च व कालावधी, उमेदवार किंवा पक्षाचे नाव, स्वतंत्र व्यक्ती असल्यास प्रतिज्ञापत्र आदी महत्वाच्या बाबींच्या नोंदीसह दोन प्रतीत साक्षांकित केलेली जाहिरात संहिता व दृक-श्राव्य चित्रीकरण सीडी किंवा पेनड्राइव्हमध्ये समितीकडे देण्यात यावा. उमेदवार व राजकीय पक्षाच्या ब्लॉग, संकेतस्थळावरील, वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवरून पोस्ट केलेला राजकीय स्वरुपाचा संदेश, मजकूर, छायाचित्र, व्हीडीओ मजकूर राजकीय जाहिरात समजली जाणार नाही, त्यामुळे त्यासाठी पूर्वप्रमाणीकरण आवश्यक नाही. तथापि, जाहिरातीचे प्रमाणीकरण आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांचा प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत. मुद्रीत माध्यमाद्वारे मतदान आणि त्यापूर्वीच्या दिवशी प्रकाशित करावयाच्या जाहिरातींचे प्रमाणीकरणही आवश्यक आहे.

# गोंदेगावच्या महिला मेळाव्यात डॉ.काळगे यांचा विजयी करण्याचा निर्धार वैशालीताई देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

लातूर : प्रतिनिधी लातूर लोकसभा निवडुकीच्या निमित्ताने लातूर तालुक्यातील गोंदेगाव येथे काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ दि. २ मे रोजी सायंकाळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला मेळावा झाला. या मेळाव्यात डॉ.काळगे यांचा विजयी करण्याचा निर्धार मोठया संख्येत उपस्थित महिलांनी केला. राहूल देशमुख यांच्या निवासस्थानी झालेल्या या महिला मेळाव्यास डॉ. सारिका देशमुख, दैवशाला राजमाने, सुनिता अरळीकर, सीमा शिरसागर, गावच्या सरपंच तनुजा देशमुख, कमलाकर शिंदे, राहुल देशमुख, विश्वनाथ देशमुख, अनिल पाटील यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, काँग्रेस पक्षाने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले.देश स्वातंत्र्य झाल्यानंतर गेल्या सत्तर वर्षांत देशाचा सर्वांगीण विकास केला.त्यामुळेच आज आपला देश एक विकसीत देश म्हणून जगात ओळखला जात आहे. त्यासाठी काँग्रेसने बलिदानही दिले.या उलट भाजपाने देशासाठी काहींही केले नाही. गेल्या दहा वर्षांत केलेल्या कामांचा भाजपाने मतदारांना हिशेब द्यावा. केवळ राजकारणासाठी समाजा समाजामध्ये फुट पाडून देशाची एकता, अखंडता धोक्यात आणण्याचे काम भाजपाने केले.त्यामुळे



मतदारांनी आता भाजपाच्या भूलथापांना बळी न पडता काँग्रेसचा हात बळकट करावा, असे आवाहन केले. यावेळी कौशाबाई देडे, शालुबाई गायकवाड, स्वाती सोनवणे, राधाबाई सोनपाके, रुक्मीनबाई देशमुख, कांचन देशमुख, अंजली देशमुख, शांताबाई गायकवाड, मुक्ताबाई जोगदंड, सीमा जाधव, प्रभावती भोसले, भाग्यश्री देडे, संध्या जाधव, उषा देडे, सुजाता देडे, अहिल्याबाई इंगळे, शामल खैरे, विश्वनाथखैरे, अमोल देडे, शरद गायकवाड, अंकुश जाधव, लक्ष्मण देशमुख, मारुतीगायकवाड, संभाजी देशमुख, संतोष जोगदंड, अरविंद देशमुख, धर्मराज देशमुख,संतोष बरकते, बालासाहेब बरकते आदी मान्यवर उपस्थित होते.

# चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन क्लिनिकव्दारे रुग्णांना घरपोच दातांचे आणि फिजिओथेरपी उपचार मिळतील डॉ. हनुमंत कराड यांचा विश्वास; डेंटल व फिजिओथेरपी मोबाईल व्हॅनचे अनावरण

लातूर :- शहरी व ग्रामीण भागातील नागरीकांना आपल्या दारात दंत रोगावर व फिजिओथेरपी उपचार घेता यावेत यासाठी दोन चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. अत्याधुनिक व सुसज्ज अशा चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन क्लिनिक व्दारे लातूर शहरासह ग्रामीण भागातील नागरीकांना दंत रोग व फिजिओथेरपी उपचार हे या घरपोच दिले जातील, असा विश्वास एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केला. माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय आणि एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन क्लिनिकचे अनावरण डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. कराड बोलत होते. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मुख शल्य तज्ञ डॉ. अमोल डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या अनेक वर्षापासून एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागात शिबिराच्या माध्यमातून दंत आरोग्य व फिजिओथेरपी उपचार सेवा देवून हजारो रुग्णांना व्याधीमुक्त करण्यात आले आहे. या सेवेची व्याप्ती वाढवून



रुग्णांना आपल्या गावात, घरासमोर जाऊन दंत व फिजिओथेरपी उपचार हे अत्याधुनिक स्वरुपात देण्याचा मानस होता, असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, याचाच एक भाग म्हणून हे दोन मोबाईल व्हॅन क्लिनिक नागरीकांच्या सेवेत दाखल होत आहेत. अत्याधुनिक सोयींनीयुक्त असलेल्या डेंटल मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील सामान्य रुग्णांवर, बेडेड (चालता-फिरता न येणाऱ्या) रुग्णांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करुन दंत रोगाचे योग्य निदान आणि प्रथमोपचार केले जातील. दात काढणे, दातांची स्वच्छता करण्याचे उपचारही केले जातील. तसेच विविध शाळांमध्ये दंत आरोग्य शिबिरे घेवून शालेय मुलांची दंत तपासणी करुन उपचार करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर फिजिओथेरपी मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून तज्ञ डॉक्टरांकडून फिजिओथेरपी उपचार सेवा दिली जाणार आहे. मान, पाठ, कंबर, गुडघे दुखी, सांधेदुखी, अर्धांगवायू व हृदयविकाराचे रुग्ण, ज्येष्ठ नागरीक आणि सिरेबल पाल्सी आजाराचे बाल रुग्ण, क्रीडा दुखापतींचे रुग्ण, बेडेड रुग्णांना अत्याधुनिक उपकरणांद्वारे फिजिओथेरपी उपचार केले जाणार आहेत. लातूर जिल्ह्यासह परिसरातील जिल्ह्यातील गरजु रूग्णांपर्यंत दंत आरोग्य आणि फिजिओथेरपी उपचार सेवा पोहचविण्याचा प्रयत्न या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून करणार असल्याचे डॉ. हनुमंत कराड यांनी सांगितले. यावेळी डेंटल व्हॅनचे पूजन उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांनी केले तर फिजिओथेरपी व्हॅनचे पूजन प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल ज्ञानोबा केंद्रे यांनी करुन शेवटी आभार मानले. या कार्यक्रमासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील डॉक्टर, कर्मचारी उपस्थित होते.

# बार्टी संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२४ साठी आर्थिक सहाय्य योजना

पुणे / प्रतिनिधी :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत यु.पी.एस.सी. भारतीय अभियांत्रिकी मुख्य परीक्षा या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. ५०,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. दि. २८ मार्च २०२४ रोजी संघ लोकसेवा आयोगाने भारतीय अभियांत्रिकी पूर्व परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार भारतीय अभियांत्रिकी सेवा पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. ५०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेमार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी येथे भेट द्यावी.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE